दाखल ता. : ०३.०१.२०१८
नोंदणी ता. : ०३.०१.२०१८
निकाल ता. : २३.०९.२०१९
कालावधी : **०१व.०८म.२०दि**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, माढा यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी : एस.एस.सय्यद यांचे समक्ष )**

**नियमित फौजदारी खटला क. १/२०१८** **नि.क्र.२७**

महाराष्ट्र सरकार तर्फे,
पोलिस ठाणे अधिकारी, टेंभूर्णी,
तहसिल माढा, जिल्हा सोलापूर. ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. भिमराव शाहू खोचरे,
वय: ५८ वर्षे, व्यवसाय— शेती,
२. शंकर भिमराव खोचरे,
वय: २७ वर्षे, व्यवसाय— शेती,
३. नवनाथ भिमराव खोचरे,
वय: २५ वर्षे, व्यवसाय— शेती,
४. अर्जून शाहू खोचरे,
वय: ५५ वर्षे, व्यवसाय— शेती,
सर्व रा. दहिवली, ता. माढा, जि. सोलापूर .. **आरोपी**

---

अभियोग पक्षातर्फे — श्री.व्ही. पी. सक्री, सहा. सरकारी अभियोक्ता
आरोपींतर्फे — श्री. एस. जे. कानडे वकील

---

**न्या य नि र्ण य**
**( अधिघोषित दिनांक २३/०९/२०१९ )**

**०१.** पोलीस ठाणे, टेंभूर्णी यांनी फिर्यादी सचिन बंकट खोचरे यांच्या फिर्यादीवरुन आरोपींविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये खटला दाखल केलेला आहे.

**खटल्याची पार्श्वभुमी थोडक्यात खालील प्रमाणे आहे.**

**०२.** दिनांक १३/११/२०१७ रोजी दुपारी ०४.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचा भाउ मंगेश हा त्यांच्या घरून कॅनॉल पट्टीने मोटारसायकलवरून गावात निघाला होता तो त्यांच्या घरापासून थोड्या अंतरावर भिमराव शाहू खोचरे यांचे शेताचे बाजूस कॅनॉल पट्टीवरून जात असताना फिर्यादीला बाहेरून त्यांच्या भावाच्या ओरडण्याचा आवाज

आला म्हणून फिर्यादी काय झाले ते पाहणेकरीता गेले असता तेथे फिर्यादीच्या भावास आरोपी भिमराव शाहू खोचरे हा त्याचे हातातील छोट्या लोखंडी गजाचे तुकड्याने मारहाण करीत होते व आरोपी शंकर भिमराव खोचरे हा लाथाबुक्यांनी मारहाण करीत होता. म्हणून फिर्यादी तेथे जाउन ''तुम्ही माझे भावास विनाकारण मारहाण का करता, त्याला मारू नका'' असे म्हणून सोडवासोडव करीत असताना तेथे आरोपी नवनाथ भिमराव खोचरे व अर्जून शाहू खोचरे असे आले त्यावेळी सदर आरोपी ''आता यांना सोडू नका'' असे म्हणून फिर्यादीला अर्जून शाहू खोचरे याने त्याचे हातातील लोखंडी छोट्या गजाच्या तुकड्याने फिर्यादीच्या उजव्या खांद्यावर मुक्कामार दिला व शंकर भिमराव खोचरे याने खाली पडलेला दगड उचलून घेउन हातात धरून फिर्यादीचे डोकीस मारला व फिर्यादीला कोच पडून रक्तस्त्राव झाला व नवनाथ भिमराव खोचरे याने लाथाबुक्यांनी फिर्यादीला मारहाण केली तसेच सदर आरोपींनी मिळून फिर्यादी व फिर्यादीचा भाउ मंगेश बंकट खोचरे असे दोघांना हातात दगड धरून व लोखंडी गजाचे तुकड्याने डोकीस व पाठीवर मुक्कामार देउन फिर्यादीच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाला. सर्व आरोपींनी मिळून पुन्हा फिर्यादी व फिर्यादीच्या भावाला शिवीगाळ करून म्हणाले की, ''तुम्ही कॅनॉल पट्टीचे रस्त्याने जायचे नाही, कारण हा रस्ता आमचे मालकीचा आहे'' असे म्हणून ''तुम्हाला जिवे ठेवणार नाही'' अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरूध्द पोलीस ठाणे टेंभूर्णी येथे फिर्याद दिली.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन पोलीस ठाणे, टेंभूर्णी यांनी दि. १४/११/२०१७ रोजी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गु. र. क्रमांक ४८५/२०१७ प्रमाणे गुन्हा नोंदवला.

**०४.** फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन पोलीसांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासीक अंमलदाराने साक्षीदारांचे बयाण नोंदविले व चौकशीचे आवश्यक कामकाज पुर्ण झाल्यावर आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

**०५.** आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये **निशाणी क्र. २०** वर दोषारोप निश्चीत करण्यात आले. आरोपींवर लावण्यात आलेले आरोप आरोपींनी नाकारुन संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी

दर्शविली.

**०६.** खटल्याचे निकाला करीता पुढील मुद्दे माझे समोर उपस्थीत होतात. त्या मुद्या बाबतचे निष्कर्ष कारण मिमांसेसहीत मी खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | दिनांक १३/११/२०१७ रोजी दुपारी ०४.०० वाजेच्या सुमारास मौजे दहिवली, ता. माढा, गावचे शिवारातील आरोपींनी त्यांचे समान उददेशाचे पुर:सरनार्थ फिर्यादी व फिर्यादीच्या भावास डोकीत, पाठीत लोखंडी गजाने व दगडाने मारून ईच्छापुर्वक दुखापत पोहचविली, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | —नकारार्थी |
| २ | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उददेशाचे पुर:सरणार्थ फिर्यादी व फिर्यादीच्या भावास मारहाण करून ईच्छापूर्वक दुखापत पोहचविली, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली काय? | —नकारार्थी |
| ३ | वरील तारीख वेळ व नमूद ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उददेशाचे पुर:सरनार्थ फिर्यादी व फिर्यादीच्या भावास शिवीगाळ करून त्यांचा अपमान करून सार्वजनिक शांततेचा भंग केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | —नकारार्थी |
| ४ | वरील तारीख वेळ व नमूद ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उददेशाचे पुर:सरनार्थ ईच्छापुर्वक फिर्यादी व फिर्यादीच्या भावास फौजदारी पात्र धाकदपटशा केली, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | —नकारार्थी |
| ५ | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

## <u>का र ण मी मां सा</u>

**०७.** आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे मौखीक व कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आला. मौखीक पुराव्यामध्ये फिर्यादी सचिन बंकट खोचरे (साक्षीदार क्र.१), मंगेश बंकट खोचरे (साक्षीदार क्र.२) यांच्या मौखीक पुराव्याचा समावेश होतो. कागदोपत्री पुराव्यामध्ये फिर्याद, पंचनामा याचा समावेश होतो. आरोपींविरूध्द सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने कलम ३१३ फौजदारी प्रक्रीया संहीता अंतर्गत आरोपींचे निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

<u>मुद्दा क्र १ ते ४ बाबत</u> :—

०८. प्रस्तुत खटल्यात आरोपींविरूध्द लावण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरीता तथाकथीत घटनेच्या वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उददेशाचे पुर:सरनार्थ फिर्यादी व फिर्यादीच्या भावास डोकीत, पाठीत लोखंडी गजाने व दगडाने मारून ईच्छापुर्वक दुखापत पोहचविली तसेच आरोपींनी त्यांच्या समान उददेशाचे पुर:सरणार्थ फिर्यादी व फिर्यादीच्या भावास मारहाण करून ईच्छापूर्वक दुखापत पोहचविली तसेच आरोपींनी त्यांचे समान उददेशाचे पुर:सरनार्थ फिर्यादी व फिर्यादीच्या भावास शिवीगाळ करून त्यांचा अपमान करून सार्वजनिक शांततेचा भंग केला तसेच आरोपींनी त्यांचे समान उददेशाचे पुर:सरनार्थ ईच्छापुर्वक फिर्यादी व फिर्यादीच्या भावास फौजदारी पात्र धाकदपटशा केली, याबाबत अभिलेखावर सबळ पुरावा येणे आवश्यक आहे.

०९. अभियोग पक्षाने फिर्यादी सचिन बंकट खोचरे (साक्षीदार क्र.१), मंगेश बंकट खोचरे (साक्षीदार क्र.२) यांचा पुरावा नोंदविला. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, त्यांनी अभियोग पक्षाचे कथनास दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे त्यांची अभियोग पक्षाचे वतीने उलटतपासणी घेण्यात आली. परंतु उलटतपासातही अभियोग पक्षास सहाय्यक असा पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाची घटना ही सिध्द झालेली नाही. सदर साक्षीदार हे अभियोग पक्षाचे कथनानुसार घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचे नमूद आहे. परंतु त्यांनी अभियोग पक्षाचे कथनास दुजोरा न दिल्यामुळे अभियोग पक्षाची फिर्याद देखील सिध्द झालेली नाही. त्यामुळे कथीत घटना घडली किंवा कसे व त्यामध्ये आरोपींचा सहभाग होता किंवा कसे या बाबी पुराव्याअभावी सिध्द झालेल्या नाहीत. त्यामुळे आरोपींना दोषी ग्राहय धरणे न्यायोचित होत नाही. अभियोग पक्षाने आरोपींवरील आरोप संशया पलीकडे सिध्द करणे क्रमप्राप्त होते. परंतु अभियोग पक्षाने इतर स्वतंत्र साक्षीदारांचा पुरावा नोंदविला नाही. त्यामुळे आरोपींवरील आरोप संशया पलीकडे सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ग्राहय धरता येणार नाही.

१०. थोडक्यात, अभियोग पक्षाचे साक्षीदारांचे मौखीक पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत आवश्यक पुरावा आला नाही. आरोपींविरुध्द सबळ, तर्कसंगत व वाजवी पुरावा असल्याशिवाय आरोपींविरुध्द आरोप

सिध्द होत नाही. आरोपींविरुध्द अपराध सिध्द होणे करीता स्वतंत्र साक्षीदाराची पुष्टी येणे आवश्यक होती. परिणामी, मी या निष्कर्षाप्रत येवू पोहचलो आहे की, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द आरोप सिध्द केले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र १ ते ४ बाबत नकारात्मक निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. ५ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१** आरोपी १. भिमराव शाहू खोचरे, २. शंकर भिमराव खोचरे, ३. नवनाथ भिमराव खोचरे, ४. अर्जून शाहू खोचरे, यांना फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २४८(१) अन्वये ***भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४*** च्या आरोपांतून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२** जप्त मुददेमाल लोखंडी गज व दगड मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

**३** आरोपींचे जामीन पत्र रद्द करण्यात येते.

**४** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७—अ च्या पुर्ततेकामी न्यायालयात सहा महिन्याच्या कालावधीकरिता प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/—चे वैयक्तिक बंधपत्र सादर करावे.

**५** न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला आहे.

दिनांक — २३.०९.२०१९.

**( एस.एस.सय्यद )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
**माढा**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/ Oder is same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Miss. P.R.Khare, |
| Court Name | : | Jt Civil Judge & J.M.F.C.,<br>Madha. |
| Judgment/Oder signed<br>by Presiding Officer on | : | 23/09/2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 24/09/2019 |